## जिल्हा व सत्र न्यायालय
## नांदेड – ४३१ ६०१

Email : mahnandc@mhstate.nic.in Fax No. : 02462 -244682

Telephone No. 02462 234555, 244683


## निविदा सूचना

याद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, नांदेड येथील संगणक विभागातील सर्व्हर तसेच अन्य संगणकास विद्युत पुरवठा करणारा युनिलाईन ऑनलाईन कंपनीचा ३ के.व्ही.ए /९६व्ही. यु.पी.एस असुन त्यासाठी १२ V ४२ Ah लीड ॲसीड बॅटरीज ची आवश्यकता आहे. त्यासाठी खालील नमुद अटी व शर्तीवर इच्छुक पुरवठादारांकडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशील | परिमाण | पुरवठा करावयाचे आहे ते ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | ॲमरॉन क्वॉन्टा १२ V ४२ Ah लीड ॲसीड बॅटरीज दोन वर्ष वॉरंटीसह सर्व करांसहीत किंमत | ०८ | जिल्हा न्यायालय, नांदेड |
| ०२ | जुन्या बॅट-या बायबॅक किंमत | | |

त्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून सदरील **ॲमरॉन क्वॉन्टा १२ V ४२ Ah लीड ॲसीड बॅटरीज दोन वर्ष वॉरंटीसह सर्व करांसहीत दराचा** समावेश असलेली सीलबंद निविदा या कार्यालयास **दिनांकः १३ सप्टेंबर, २०२४** रोजीपर्यंत किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत पोहोचतील या बेताने पाठविण्यात यावेत. निविदेमध्ये मागणी केलेल्या बॅटरीज उधारीवर पुरवठा करण्याची तयारी पुरवठादाराची असावी, कोषागारातुन देयक पारित झाल्यावर पुरवठादारास देयकाची रक्कम प्रदान करण्यात येईल.

सीलबंद लिफाफा "**मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड**" यांच्या नावे " **ॲमरॉन क्वॉन्टा १२ V ४२ Ah लीड ॲसीड बॅटरीज पुरवठा निविदा** " असे ठळक अक्षरात लिहुन द्यावे.

## निविदा खालील अटींवर मंजूर करण्यात येईल.

- मागणी केलेल्या ॲमरॉन क्वॉन्टा १२ V ४२ Ah लीड ॲसीड बॅटरीज *चा* पुरवठा जिल्हा न्यायालयात करण्याची व्यवस्था पुरवठादाराकडे राहिल. तसेच सदरील बॅट–या युपीएस रॅकमध्ये बसवुन युपीएस चालू करुन द्यावे लागेल. त्यासाठी वाहतुक, हमाली किंवा इतर कोणतेही खर्च/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

- पुरवठा करण्यात आलेल्या ॲमरॉन क्वॉन्टा १२ V ४२ Ah लीड ॲसीड बॅटरीज ची मागणीनुसार असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले उधारी देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातुन देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास कार्यालयीन कामकाजानुसार ऑनलाईन रक्कम/धनादेश अदा करण्यात येईल.
- प्राप्त निविदा मंजूर अथवा रद्द करण्याचे संपुर्णतः अधिकार या न्यायालयास राहतील.
- निविदा दाखल करणा–या पुरवठादाराकडे GST/सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक आहे.
- देयक अदा केल्यानंतर देयकाची पावती सादर करावी लागेल.
- सदरहू निविदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरुस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार/निविदा कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णतः अधिकार हा या कार्यालयाचा राहील.
- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून GeM वरील दर कमी असल्यास GeM Portal वरुन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहील.

आदेशावरुन

प्रबंधक, 03/09/2024

जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांकः ०३ सप्टेंबर, २०२४ }

**जावक क्रमांक/संगणक विभाग/ 9112 /२०२४**

प्रति,

1) जिल्हा न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
2) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
3) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
4) जिल्हाधीकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
5) जिल्हा परिषद, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
6) नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांचे नोटीस बोर्ड

आदेशावरुन

प्रबंधक, 03/09/2024

जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांकः ०३ सप्टेंबर, २०२४ }